# २. नागरी संरक्षण संघटना

**उद्‌दिष्टे**

(१) विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, नीतिमूल्ये जागृत करणे.

(२) राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय चारित्र्यांची जोपासना करणे.

(३) जीवितहानी, वित्तहानीचे प्रमाण कमी करणे.

(४) महिला, बालके, वृद्‌ध व्यक्ती यांना आपत्तीच्या वेळी मदत करणे.

(५) आपत्कालीन परिस्थितीमध्ये खचून न जाता स्वत:चे व समाजाचे मनोधैर्य वाढवणे.

नागरी संरक्षण संघटना ही जगभरात आणि भारतामध्ये उदभवणाऱ्या नैसर्गिक आणि मानव निर्मित आपत्तीमध्ये सामान्य नागरिकांना त्याबद्‌दल मार्गदर्शन आणि मदत करते. नागरी संरक्षण संघटना ही एक संघटना अशी आहे की, जी सामान्य नागरिकांना युध्द्‌जन्य परीस्थितीमध्ये हवाई हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी सहाय्य करते. नागरी संरक्षण संघटना आपत्कालीन परीस्थितीमध्ये प्रतिबंधात्मक उपाययोजना, कमीतकमी जिवित व वित्तहानी तसेच सामान्य नागरिकांचे आपत्कालीन परीस्थितीमध्ये मनोधैर्य उंचावणाऱ्याचे कार्य करण्यासाठी नागरी संरक्षण कायदा १९६८ नुसार स्थापन झाली. नागरी संरक्षण संघटना समाजातील विविध क्षेत्रामध्ये उदा. स्थानिक नागरीक, औद्योगिक, शैक्षणिक इत्यादी संस्थामध्ये नैसर्गिक व मानव निर्मित आपत्ती, परकीय आक्रमण इत्यादीपासून संरक्षण करण्याचे प्रशिक्षण देते. ही संघटना आपत्कालीन स्थितीत इतर शासकीय संस्थाच्या बरोबर कार्यात सहाय्य करते. या संघटनेवर नागरी संरक्षण अधिकाऱ्यांचे नियंत्रण असते



## नागरी संरक्षण संघटनेची कार्ये

नागरी संरक्षण संघटनेचे कार्य पुढील प्रमाणे चालते.

### १) शहराची विभागणी (Control by sector and Divisions)

मोठ्या शहराचे क्षेत्र लक्षात घेऊन शहराचे विभाग पाडण्यात येतात. त्या प्रत्येक विभागाची व्यवस्था पाहणारे केंद्र निश्चित करण्यात येते. तेथे एका वॉर्डन ऑफिसरची नेमणूक करण्यात येते. तो आपल्या विभागातील संरक्षण व्यवस्थेचा प्रमुख असतो व सर्वांना मार्गदर्शन करतो.

शहराचे जिल्हाधिकारी हे सर्व शहराचे चीफ वॉर्डन असतात. ते त्यांच्याकडील प्रत्येक विभागात एक डिव्हीजनल वॉर्डन नेमून संघटनेची कार्यवाही करतात. लोकसंख्येच्या आधारावर वॉर्डची आखणी करण्यात येते.

### २) वॉर्डन सेवा (Warden Service)

जिल्हाधिकारी लोकसंख्येच्या आधारावर वॉर्डची आखणी करतात. तेथे वॉर्डन, उपप्रमुख वॉर्डन, विभागीय वॉर्डन, उपविभागीय वॉर्डन यांची नेमणूक होते. यांची कामे प्रशासकीय स्वरूपाची असतात. वॉर्डनच्या प्रशिक्षणामध्ये युद्धापूर्वी, युद्धाच्या वेळी, युद्ध संपल्यानंतर आवश्यक कार्य, त्याची समयसूचकता, मदत, तसेच मार्गदर्शन इ. घटकांचा अंतर्भाव असतो. जनजीवन सुरळीत करण्याच्या दृष्टीने हे वॉर्डन योग्य ती माहिती नागरिकांना देतात व प्रशासकीय कामासाठी अहवाल पुरवतात.

### ३) आगीचे नियंत्रण (Fire Fighting)

आग लागल्याचे कळताच अग्निशामक यंत्रणा त्वरित संबंधित ठिकाणी पोहचण्याचा प्रयत्न करते. वास्तविक अग्निशामक यंत्रणा ही २४ तास सज्ज असते. विविध अग्निशामकांच्या साहाय्याने आग विझवली जाते. इमारतीमध्ये अडकलेल्या व्यक्तीला खाली उतरवले जाते. धुरामुळे बेशुद्ध पडलेल्या व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना प्रथमोपचारासाठी पाठवले जाते. आग विझवणे, आग पुढे वाढू नये म्हणून प्रयत्न करणे, इमारतीतील लोकांना सुरक्षित स्थळी हलवणे, विद्युत पुरवठा खंडित करणे अशी कामेही अग्निशामक यंत्रणेद्वारे केली जातात.

### ४) प्रकाशबंदी (Black out)

बहुतेक विमान हल्ले हे रात्रीच्या वेळी केले जातात. अशा वेळी लोकवस्ती ही नेमकी कोठे आहे हे शत्रूला समजू नये म्हणून प्रकाशबंदी करणे गरजेचे असते. घराच्या खिडकीतून प्रकाशाची तिरीपही बाहेर जाऊ नये यासाठी घराच्या खिडक्यांना आतील बाजूने काळे कागद चिकटवण्याच्या सूचना पूर्वी नागरिकांना दिल्या जात असत. तसेच अत्यावश्यक असेल तरच दिवा लावावा असे आवाहन नागरिकांना केले जात असे. खबरदारीचा उपाय म्हणून युद्धकाळात संध्याकाळी सहा ते पहाटे साडेपाचपर्यंत विद्युत केंद्रे बंद ठेवली जात असत. युद्धकाळात प्रकाशबंदी नियमाचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

### ५) मालमत्तेची जपणूक (Protection of Property)

विमानातून होणारा बॉम्ब हल्ला, तोफांचा मारा व अन्य कारणांमुळे आगी लागतात. अशा वेळी राष्ट्रीय संपत्तीचे तसेच खाजगी मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी नागरी संरक्षण संघटनेची मदत घेतली जाते.


### ६) जखमींची ने-आण आणि वैद्यकीय उपचार

### (Rescue Operation and Medical Aid)



मानवनिर्मित नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागतात. तर काही जण जखमी होतात. काही जखमा ह्या गंभीर स्वरूपाच्या असतात अशा वेळी प्राथमिक उपचार केंद्र, प्रथमोपचार पथक, फिरता शस्त्रक्रिया विभाग, रुग्णवाहिका या बाबी आवश्यक ठरतात.

### ७) सूचना यंत्रणा (Warning System)



आपत्कालीन घटनेसंदर्भात संबंधित आपत्ती विस्थापनास ताबडतोब माहिती मिळणे गरजेचे असते. याकरिता सायरन (भोंगा वाजवणे),बिनतारी संदेश देणे (रडारच्या साहाय्याने), दूरध्वनी इत्यादीचा वापर होतो यामुळे आपत्ती निवारण्यास मदत होते.

### ८) कल्याण केंद्रे (Welfare Centres)

आपत्कालीन गावांचे व शहरांचे विस्थापन, पुनर्वसन करण्यासाठी त्यांच्या मूलभूत गरजा भागवणे, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, शव विल्हेवाट, स्वच्छता, आरोग्य, मालमत्ता संरक्षण इ. कार्य ही मदत केंद्रे करतात.

### ९) पोलीस सेवा (Police service)

आपत्ती कालावधीमध्ये किंवा त्यानंतर अफवांमुळे जनतेमध्ये भीती पसरते. अफवांमुळे खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता असते. अशा वेळी हे नुकसान टाळण्याचे काम पोलीस दल, गृहरक्षक दल, छात्र सैनिक, सेवाभावी संघटना करत असतात.

### १०) मुख्यालय सेवा (Head Quarter Service)

'प्रशासन' व 'प्रशिक्षण' करण्याचे हे कार्य या पथकाकडे असते. सेवेचा भाग म्हणून हे पथक नियमितपणे काम करत असते.

### उपक्रम

१) जवळच्या नागरी संरक्षण केंद्रास भेट देऊन तेथील कार्य जाणून घ्या.
२) अग्निशमन केंद्रास भेट देऊन तेथील आग विझवण्याच्या उपक्रमाची माहिती जाणून घ्या.
३) होमगार्ड व त्यांचे कार्य यांविषयी माहिती जाणून घ्या.

**आधुनिक तंत्राचा वापर –**

१) मोठमोठे कारखाने, शाळा, कॉलेज येथे आग कुठे लागली ते ठिकाण सी.सी कॅमेऱ्याच्या साहाय्याने कळते.
२) सॅटेलाईट यंत्रणेचा वापर होतो.
३) पोलीस यंत्रणेत वॉकी-टॉकीचा वापर होतो.

## स्फूर्ती गीत



घडवायचा आहे आम्हां भारत देश महान
आर. एस.पी.चा सैनिक व्हावा या देशाचा प्राण ।। धृ।।
विज्ञानाची कास अंतरी ज्ञानाची ज्योत
पहाट उद्याची आज जहाली, माझ्या मनमंदिरात
रक्तामधले सूर्य पेटले
खांद्यावर आसमान..... घडवायचा आहे आम्हां ।।१।।
हरितक्रांतीचे आम्ही गायक उत्थान क्रांतीचे आम्ही नायक
हृदया भरली प्रभा मुक्तीची, वार बिजलीचे प्रहार झेलून
शिव अंगणी घरकूल चिमणे, सत्यशील विधान
घडवायचा आहे आम्हां..... ।।२।।
करुणेचा तो निर्मळ निर्झर, रक्तामधूनी वाही सळसळ
वैराग्याच्या पाडीत भिंती, विहार उभारू उंच उन्नत
शिंपीत चांदणे खुलवित बागा, आमचे हो बलिदान
घडवायचा आहे आम्हां......।।३।।

## मूल्यमापन

| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
|---|---|---|---|---|
| अग्निशमन केंद्रास भेट | आग विझवण्याच्या सर्व साधनांची प्रात्यक्षिकांसह माहिती घेतली. | आग विझवण्याच्या साधनांची माहिती घेतली. | आग विझवण्याच्या साधनांच्या माहितीकडे दुर्लक्ष केले. | |
| जनजागृती | अफवांवर विश्वास ठेवू नका असे प्रत्यक्ष भेटून लोकांना सांगितले. | अफवांवर विश्वास ठेवू नका असे लोकांना कधी-कधी सांगितले. | अफवांवर विश्वास ठेवला. | |
| सार्वजनिक मालमत्ता सुरक्षा | स्वत:च्या मालमत्तेसारखीच सार्वजनिक मालमत्तेचीही काळजी घेतली. | सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेतली. | सार्वजनिक मालमत्तेची काळजी घेतली नाही. | |

***

## माझा अभ्यास

**१. नागरी सुरक्षा संघटना पथकाविषयी थोडक्यात माहिती लिहा.**

**२. आवश्यक असे फोन नंबर लिहा.**

१) अग्निशमन ................................

२) पोलिस ................................

३) ॲम्ब्युलन्स/रुग्णवाहिका ................................

३. आर.एस.पी स्फूर्ती गीत लिहून काढा.

## उपक्रम

**आधुनिक तंत्राचा वापर**

खालील संकेतस्थळाला भेट द्या,

Civil Defence Of Maharashtra

http://maharashtracdhg.gov.in